**वाचकांना सुचना**

दि. १० ऑक्टोंबर २०२६ रोज शनिवारला पितृपक्ष अमावस्या निमित्ताने दै. लोकजन कार्यालय व प्रेसला सुट्टी राहील. त्यामुळे दिनांक ११ ऑक्टोंबर २०२६ रविवारचा अंक प्रकाशित होणार नाही. नेहमीप्रमाणे दि. १२ ऑक्टोंबर २०२६ पासून नियमित अंक प्रकाशित होईल. कृपया याची 'मराठी दैनिक लोकजन' च्या वाचक, एजंट व जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

संपादक
मराठी दैनिक लोकजन

गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील जनसामान्यांचे हक्काचे व्यासपीठ

Epaper-www.lokjan.com

मराठी दैनिक

# लोकजन

मुख्य संपादक– प्रा. एच. एच. पारधी





सर्व पितृमोक्ष अमावस्या



▶ वर्ष 15 – ▶ अंक 155 Reg. No. – MA HMAR/2011/42364 ▶ भंडारा ▶ दि. 10 ऑक्टोंबर 2026 शनिवार ▶ डाक पंजी. NPMFL/108/2025-2027 ▶पृष्ठ 6 ▶ किंमत 2.00


## एक नजर देशावर....

✪ मुंबई: शिंदेंच्या शिवसेनेचा बडा नेता पुन्हा ठाकरे गटात परतणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिंदेंच्या शिवसेनेचे माजी खासदार गजानन किर्तीकर नाराज असल्याची माहिती हाती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे येत्या दिवसांत शिंदे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात आहे.

✪ पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू बासित अली यांनाही नानांच्या निधनाने मोठा धक्का बसला. त्यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत नाना पाटेकर यांच्यासोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

✪अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना मोठा धक्का बसला आहे. अमेरिकन सरकारने अनेक प्रमुख जागतिक आयटी कंपन्यांना 'पर्मनंट लेबर सर्टिफिकेशन प्रोग्राम' या प्रक्रियेतून तात्पुरते वगळले आहे.

✪ पाकिस्तान: माजी क्रिकेट पटू बासित अली म्हणाले मित्र आणि जिवंत दंतकथा नाना पाटेकर आता आपल्यात नाहीत. ते एक अद्भुत व्यक्ती होते. चित्रपटांमध्ये त्यांनी साकारलेली पात्रे त्यांच्या खऱ्या आयुष्यातील व्यक्तिमत्त्वासारखीच होती

✪ अमेरिकेतील 'ग्रीन कार्ड' मिळवण्याच्या मार्गात मोठे काटे तयार झाले आहेत. याचा थेट परिणाम टीसीएस, कॉग्निझंट, इन्फोसिस, विप्रो, एचसीएल, कॅपजेमिनी, मायक्रोसॉफ्ट आणि ॲडोब या सारख्या भारतीय कंपन्यांवर होणार आहे.

# भंडारा जि. प. शिक्षण विभागात बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचा स्फोट

**दिव्यांग घोटाळा**
**दै. लोकजन विशेष**
भाग–१

## ५४ शिक्षक-कर्मचारी बोगस

काशिनाथ ढोमणे

**भंडारा :–** भंडारा जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात दिव्यांग आरक्षणाचा गैरवापर करून नोकरी मिळविल्याचा तसेच इतर योजनांचा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालय, नागपूरच्या दिव्यांग मंडळाने केलेल्या पडताळणीत जिल्ह्यातील ५४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व ४० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे समोर आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर झालेल्या या पडताळणीमुळे जिल्हा परिषद

**या घोटाळ्यामुळे खऱ्या दिव्यांग उमेदवारांवर अन्याय झाला असून, बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे नोकऱ्या बळकावल्याचा आरोप होत आहे. या ५४ जणांवर सेवा समाप्ती, वेतन वसुली आणि फौजदारी कारवाई होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) एन. एन. माने यांनी दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी काढलेल्या आदेशानुसार सर्व पंचायत समितीं

**बोर्डाच्या वैद्यकीय तपासणी नंतर अशी निघाले टक्केवारी**

| | |
|---|---|
| शून्य टक्के | – ०४ |
| ०१ ते १० टक्के | – ०७ |
| ११ ते २० टक्के | – २४ |
| २१ ते ३० टक्के | – १५ |
| ३१ ते ३९ टक्के | – ०४ |

गटशिक्षणाधिकाऱ्यांना आणि मुख्याध्यापकांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. हे पत्र 'प्रथम प्राधान्य/तात्काळ/काल मर्यादित' म्हणून पाठवण्यात आले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. भंडारा यांच्या कार्यालयाने नागपूरच्या शासकीय

### प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

४० टक्के पेक्षा कमी प्रमाण असतांना हे प्रमाणपत्र सुरुवातीला कसे ग्राह्य धरले गेले? वैद्यकीय पडताळणी शिवाय नियुक्त्या झाल्या कशा? त्यांना प्रमाणपत्र देणारे वैद्यकीय अधिकारी कोण? यावर प्रश्न उपस्थित केल्या जात आहे.

वैद्यकीय महाविद्यालयाकडे प्रमाणपत्रे पडताळणीसाठी पाठवली होती. नागपूर मंडळाने जून ते सप्टेंबर २०२६ दरम्यान १३ वेगवेगळ्या पत्रांद्वारे आपला अहवाल सादर केला. या अहवालात ५४ कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व अपात्र ठरले आहे.

प्राप्त यादीत पवनी, भंडारा, लाखांदूर, लाखनी, तुमसर, मोहाडी आणि साकोली या सर्व तालुक्यातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यातील बहुतांश जण सहाय्यक शिक्षक, तर काही मुख्याध्यापक, विषय शिक्षक आणि उर्दू माध्यमाचे शिक्षक आहेत.

यादीवर नजर टाकल्यास धक्कादायक वास्तव समोर येते. अनेकांचे प्रमाण ०० टक्के कायमस्वरूपी, ०५ टक्के अस्थायी, १२ टक्के, १८ टक्के, २० टक्के असे आहे. शासनाच्या नियमानुसार दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी किमान ४० टक्के दिव्यांगत्व असणे बंधनकारक आहे. एका प्रकरणात तर 'दिव्यांग प्रमाणपत्रासाठी पात्र ठरत नाही' असा स्पष्ट शेरा मारण्यात आला आहे.

पं. स. मोहाडी येथील एका शिक्षकाचे प्रमाण ०० टक्के कायमस्वरूपी, तर पं.स. तुमसर येथील एका शिक्षकाचे ०२ टक्के कायमस्वरूपी दाखवण्यात आले आहे. यावरून सुरुवातीला सादर केलेले प्रमाणपत्र कसे मिळवले, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### आता पुढे काय?

**शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या पत्रात स्पष्ट म्हटले आहे की, ज्या कर्मचाऱ्यांचे पडताळणी अहवाल ४० टक्क्यांपेक्षा कमी आहेत, त्यांच्यावर आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी/शिक्षक यांच्या दिव्यांग लाभाबाबत कार्यवाही करण्यात यावी. याचा अहवाल परिशिष्ट–अ आणि प्रपत्र तयार करून हार्ड आणि सॉफ्ट कॉपीत तात्काळ सादर करावा. तसेच शासकीय सेवेत रुजू झाल्याच्या दिनांकाची नोंद मूळ सेवा पुस्तिकेवरून तपासून पाठवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.**

## ट्रॅक्टर तलावात कोसळून ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**लाखनी :–** मेंढा/पोहरा पहाडी येथील नैसर्गिक तलावाजवळ ट्रॅक्टर अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ०८ आक्टोंबर रोजी दुपारी १२.३० वाजता सोपान बंडू गिलोरकर, वय ३५, रा. मुरमाडी/तुप हा जितेंद्र मेश्राम यांच्या मालकीचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. एम.एच. ३६ ए.आर. ३४६७) घेऊन गिट्टी आणण्यासाठी जात होता. मेंढा/पोहरा पहाडी येथील देशमुख केशरच्या बाजूच्या नैसर्गिक तलावाजवळ (बोडी) ट्रॅक्टरवरील ताबा सुटल्याने ट्रॅक्टर थेट तलावात पडला. यात डोक्याला व हातापायाला गंभीर मार लागल्याने त्याचा ग्रामीण रुग्णालय लाखनी येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. फिर्यादी बंडू मोतीराम गिलोरकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. लाखनी येथे मर्ग दाखल करण्यात आला असून तपास सपोनि गावंडे करीत आहेत.

## तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत करडी महाविद्यालयाची गरुड झेप

### ७ विद्यार्थ्यांनी पटकावला प्रथम क्रमांक

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**करडी / पालोरा :–** नुकत्याच हरदोली (झंझाड) येथे पार पडलेल्या तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, करडी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करीत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारात करडी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत तालुक्यात आपला दबदबा निर्माण केला. यात प्रवीण राऊत – १०० मीटर धावणे – प्रथम क्रमांक, तुषार पाचघरे – ४०० मीटर व १५०० मीटर धावणे – प्रथम क्रमांक, रितिक भुसारी – ३००० मीटर धावणे – प्रथम क्रमांक, क्रिश सोनवणे– ३००० मीटर धावणे – प्रथम क्रमांक, प्रवेश बोंद्रे – ५ किमी चालणे – प्रथम क्रमांक, प्रणय सिंदपुरे – ५ किमी चालणे – प्रथम क्रमांक, खुशबू शहारे – थाळीफेक – प्रथम क्रमांक यांचा समावेश आहे.

या सर्व विजेत्या खेळाडूंचा महाविद्यालयाचे सचिव वासुदेव बांते व प्राचार्या डॉ. स्मिता अंबादे तसेच प्राध्यापक वृंद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव, प्राचार्या व सर्व शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले असून, पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जुन्या वादातून तरुणावर विटेने हल्ला

**जवाहरनगर :–** फिर्यादी पियुष टिकमदास हटवार, वय १८ वर्ष, रा. वार्ड नं. ३ परसोडी हे दि. ०६ ऑक्टोबर रोजी रात्री ०९.४५ वाजता जेवण करून गावातील अंकित वैद्य यांच्या चहाच्या दुकानात गेले होते. तेथे अगोदरच हजर असलेला आरोपी भगवान घनशाम आंबिलडूके, वय ५०, रा. परसोडी याने फिर्यादीला पाहताच दि. ०२ ऑक्टोबर रोजी लग्न कार्यक्रमात झालेल्या वादाचा राग काढला. 'तू माझी गाडी पाडून फोडलीस' असे म्हणत त्याने शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर दुकानाच्या बाजूला असलेल्या मातीच्या विटाने फिर्यादीच्या कपाळावर, कानाजवळ आणि डाव्या हातावर मारहाण करून जखमी केले.

## कत्तलीसाठी जाणाऱ्या १८ गोवंशाची सुटका

### २ आरोपीवर गुन्हा दाखल ; २ लाख ७० हजाराचा मुद्देमाल जप्त

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**सिहोरा :–** मध्यप्रदेश व महाराष्ट्राच्या सीमेवर आणि भंडारा जिल्ह्याच्या अंतिम टोकावर असलेल्या मुरली ते चांदपूर रस्त्यावर गुरांना कृरतेची वागणूक देत आखूड दोराने बांधून वेदना देत कत्तलीसाठी नेण्याच्या तयारीत असलेल्या आरोपींना पोलीस स्टेशन सिहोराचे ठाणेदार विजय कसोधन व त्यांच्या चमुने सापळा रचला व आरोपींना ताब्यात घेऊन १८ गुरांची सुटका करुन त्या गुरांची ध्यान फाउंडेशन गौशाळा संस्था गरडा तालुका लाखनी येथे रवानगी करण्यात आली व यातील आरोपी अवधूत उरकुडा मरकाम वय ६३ वर्ष रा. मुरली जिल्हा भंडारा व दिनेश तांडेकर वय ४० वर्ष मोहगाव


कारवाईत उपस्थित ठाणेदार विजय कसोधन व त्यांची चमु

नांदी जिल्हा बालाघाट यांचेवर अ. क्र. ३६६/२०२६ दि. ८ ऑक्टोंबर अन्वये सिहोरा पोलिसात कलम ११ (१) (ए ) (एफ) (एच) अधिनियम १९६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरची कारवाई काल ८ ऑक्टोबर रोजी सा. ४ वाजताचे सुमारास करण्यात आली.

या प्रकरणातील फिर्यादीने पंचा समक्ष मुरली येथे मुरली ते चांदपुर कडे जाणाऱ्या चांदपूर जलाशयावरील कॅनॉल मार्गाच्या बाजुला धाड घातली. कॅनलच्या बाजुला पांढऱ्या रंगाचे १४ बैल प्रत्येकी किंमत १५ हजार रूपये प्रमाणे २ लाख १० हजार रुपये व लालसर रंगाचे ४ बैल प्रत्येकी किंमत १५ हजार रुपये प्रमाणे ६० हजार रुपये असे एकुण २ लाख ७० हजार रुपये किमतीच्या गुरांना आखुड दोर खंडाने बांधुन त्यांना चारा पाण्या विना वेदना व यातना तसेच क्रूरतेची वागणुक देतांना मिळुन आल्याने आरोपींवर कारवाई करीत १८ जनावरे (बैल) पालण पोषन व सुरक्षिततेसाठी ध्यान फांऊडेशन गौशाळा संस्था गराडा ता. लाखणी येथे रवानगी करण्यात आली असून दोन्ही आरोपीवर गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

## पाळीव कुत्रा अंगावर सोडून मारहाण, करडी पोलिसात गुन्हा

**करडी/पालोरा :–**फिर्यादी सचिन भगवान बांते, वय २१, रा. नवेगाव याने दिलेल्या तक्रारीनुसार, दि. ०८ आक्टोंबर रोजी सकाळी ०९.३० वाजता तो आपल्या शेतावर जनावरे चारत असताना आरोपी क्र. १ प्राणहंस जयदेव चामलाटे हा आपल्या शेतातून पाळीव कुत्र्यासह गवताचा भारा घेऊन जात होता. 'आमच्या शेतातून का जाता' असे विचारल्यावर आरोपीने शिवीगाळ करून 'तुझ्या आज्या–बापाची जागा आहे का?' असे म्हणून गवताचा भारा खाली फेकला, मानेला पकडून खाली पाडले व मुक्का मार लागला. त्यानंतर त्याने सोबत असलेला पाळीव कुत्रा अंगावर सोडला, ज्याने मानेला चावा घेतला. यानंतर आरोपीचे भाऊ संग्राम, अजवान आणि आशिष चामलाटे तेथे येऊन तक्रारदारच्या वडिलांना धक्काबुक्की करून 'आम्ही पाच भाऊ आहोत, जास्त कराल तर जिवाने मारून टाकू' अशी धमकी दिली.

## राजेंद्र सपाटे आत्महत्या प्रकरणात पालकमंत्र्यावर गुन्हे दाखल करा

### शिवसेना (उ.बा.ठा.) चे जिल्हाप्रमुख संजय रेहपाडे यांची मागणी

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा :–** मोहाडी तालुक्यातील धोप येथील कर्जबाजारी असलेले मयत शेतकरी राजेंद्र सपाटे यांच्या आत्महत्येस जबाबदार असलेले जिल्हयाचे पालकमंत्री पंकज भोयर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर ३०६ चा गुन्हा दाखल करण्याची मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे आफिसर क्लब येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

संजय रेहपाडे पुढे म्हणाले, राज्य शासनाने १५ दिवसाअगोदर राज्यातील ३५८ तालुक्यापैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले. भंडारा जिल्हयातील सुध्दा ७ पैकी भंडारा, पवनी आणि लाखांदूर हे ३ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले. हया तीन तालुक्यांसारखीच परिस्थिती जवळजवळ उर्वरीत मोहाडी,



तुमसर, लाखनी व साकोली तालुक्यातही असतांना फक्त तीनच तालुके कोणत्या आधारे दुष्काळग्रस्त घोषित केले. हे कळायला मार्ग नाही. त्या निमित्ताने जिल्हयाचे पालकमंत्री ना. पंकज भोयर हे आठवडाभरापुर्वी जिल्हा दौऱ्यावर असतांना मोहाडी तालुक्यात सुध्दा गेले. त्यावेळी मयत शेतकरी राजेंद्र सपाटे यांनी दौऱ्यावर असलेल्या पालकमंत्र्यांना त्यांची व्यथा बोलून दाखवत त्यांच्या शेतापर्यंत चालण्याची आणि नहराची, शेतीची परिस्थिती पाहण्याची रडतरडत विनवणी केली. परंतु संवेदना हरपलेल्या पालकमंत्र्यांनी ना संबंधित जबाबदार अधिकाऱ्याला फोन केला, ना त्या शेतकऱ्याच्या बांधावर जाण्याचा त्रास घेतला. त्यामुळे आधीच मनातून खचलेले राजेंद्र सपाटे हे अधिकच खचले आणि त्यातुनच हे टोकाचे पाऊल उचलून विहीरीत उडी घेऊन आत्महत्येचा मार्ग अवलंबिला.

मग पालकमंत्र्यांचा दौरा हा दुष्काळी पाहणी, देखावा होता की शेतकरी बांधवांना धीर देण्यासाठी होता की केवळ स्टंटबाजी होती? हा प्रश्न या निमित्ताने नक्कीच उपस्थित होतो. सदर प्रकारावरून महायुती सरकार हे शेतकरी विरोधी आहे हे स्पष्ट होते आणि अशा मंत्र्यांमुळे राज्य सरकारची पत कमी होत असुन अशा बेजबाबदार मंत्र्यांना त्वरीत मंत्री पदावरून बाजूला करण्याचे सौजन्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवावे, असेही रेहपाडे म्हणाले.

त्या दिवशी जर पालकमंत्री यांनी राजेंद्र सपाटे हयांना धीर देत अधिकाऱ्याला फोन केला असता, बांधावर गेले असते तर कदाचित सपाटे यांनी हे टोकाचे पाऊल उचलले नसते. ज्या अधिकाऱ्याकडे शेताजवळच्या नहरासाठी वारंवार खेट्या घालत होते, जे अधिकारी राजेंद्र सपाटे यांच्या तक्रारीची दखल घेत नव्हते त्या अधिकाऱ्यांवर आणि जिल्हयाचे पालकमंत्री पंकज भोयर यांच्यावर राजेंद्र सपाटे यांच्या आत्महत्येस जवाबदार ठरवून त्यांच्यावर ३०६ कलम अन्वये गुन्हा दाखल करून संवेदना हरपलेल्या पालकमंत्र्याला तात्काळ मंत्रीपदावरून कमी करण्याची आणि अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी शिवसेना (उ.बा. ठा) केली आहे. राजेंद्र सपाटे यांच्या कुटुंबीयास शासनाने मुलास नोकरी आणि एक करोड रुपयाची आर्थिक मदत त्वरित जाहीर करण्याची मागणी शिवसेना तर्फे पत्रकार परिषदेतून करण्यात आली.

यावेळी पत्रकार परिषदेमध्ये जिल्हा समन्वयक सुधाकर कारेमोरे, तालुकाप्रमुख तिलक सार्वे, शहरप्रमुख राकेश आग्रे, शहर संघटक मयूर जोशी उपस्थित होते.

## 'सँन्डी किचन' रेस्टॉरंटवर पोलिसांचा छापा

### अवैध दारूसह १ लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा :–** पोलीस स्टेशन जवाहरनगर हद्दीतील कवडसी फाटा येथील प्रसिद्ध 'सँन्डी किचन ॲन्ड रेस्टॉरंट' वर पोलिसांनी छापा टाकून अवैध विदेशी दारूचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत एकूण १ लाख १३ हजार २९५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, भंडारा येथील पोहवा. राऊत यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, कवडसी फाटा येथील सँन्डी किचन ॲन्ड रेस्टॉरंटमध्ये कोणताही परवाना नसताना अवैधरित्या विदेशी दारूची विक्री सुरू होती. पोलिसांनी छापा टाकला असता आरोपी क्र. १ संदीप सुधाकर चन्ने (वय ३९, रा. राजुरा, जि. चंद्रपूर, ह.मु. सँन्डी किचन कव[illegible]रोपी



क्र. २ मालक संदीप सुरेश कृपाण (वय ४१, रा. गांधी वार्ड शहापूर, ह.मु. सिताराम सिटी भोजापूर) हे दोघे मिळून विविध ब्रँडची एकूण ३७ हजार २९५ रुपये किमतीची विदेशी दारू बाळगताना मिळून आले. दारू ठेवण्यासाठी वापरलेली फ्रीज किंमत ७० हजार रुपये आणि लोखंडी कपाट किंमत ६ हजार रुपये असा एकूण १ लाख १३ हजार २९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात तिसरा आरोपी सरगम वाईन शॉपी, भंडारा चा मालक मयुरेश अनिल पंचबुद्धे (वय ३०) रा. सहकार नगर भंडारा हा आहे. त्याने त्याच्या वाईन शॉपीमधून कोणताही परवाना नसताना मोठ्या प्रमाणात दारूची विक्री/पुरवठा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे तिन्ही आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नूरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा तेजस सारडा यांच्या मार्गदर्शनात पोहवा. राऊत, पोहवा. बुरडे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, भंडारा यांनी केली असून पुढील तपास जवाहरनगर पोलीस करीत आहेत.

विचारधनः– शरीर पाण्यामुळे, मन सत्यामुळे तर आत्मा ज्ञानामुळे पवित्र राहतो.

# संपादकीय...

## अभिनयाचे रंग भरणारा मानसीचा चित्रकार

माचिस चक्रावणिजदल सशक्त आणि चित्रसृष्टीने जे काही दिग्गज, सशक्त आणि पाटेकर हे नाव ठळकपणाने समोर येते. अत्यंत अनपेक्षित आणि धक्कादायक अशी त्यांच्या निधनाची बातमी सगळ्यांसाठीच सुन्न करणारी ठरली. अभिनेता कसा असावा असा जर प्रश्न उपस्थित झाला तर तो नाना पाटेकरांसारखा असावा. असेच त्याचे समर्पक उत्तर देता येऊ शकते. आपल्यामध्ये असलेल्या कलागुणांचा उपयोग चरितार्थासाठी करणं हा एक अनिवार्य भाग असतो. परंतु आपल्यामधल्या कलेला बाजारी स्वरूप येणार नाही. आपल्यामधला कलाकार संवेदनशीलता गमावणार नाही. ज्या कलेने आपल्याला मोठं केलं त्याच कलेचा नावलौकिक टिकून राहील. पैशापेक्षाही आपल्यातील कलागुणांच्या प्रतिष्ठेला जपण्याचा परिपक्वपणा हे नाना पाटेकरांच्या व्यक्तिमत्वाचं एक आगळेवेगळे वैशिष्ट्य ठरतं. मनोरंजन किंवा चित्रपटसृष्टीमध्ये गडगंज पैसा आहे. प्रतिष्ठा, नावलौकिक या सगळ्याच गोष्टी अतिशय सहजपणे उपलब्ध होतात. म्हणून त्यांच्यामागे धावत सुटणं हे नाना पाटेकरांना मान्य नव्हतं. साधारणपणे अभिनेता असो, गायक असो, लेखक असो, यांनी किती चित्रपटांमध्ये भूमिका केल्या किती हजार गाणी गायिली किंवा खंडीभर पुस्तकं लिहीली याच्यावरून त्यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करण्याचाही प्रकार घडतो. आपल्याला मागणी आहे. याची एकदा चटक लागली की, अशी प्रसिद्धी मिळवणारे लोक फारसा विचार करत नाहीत. जोपर्यंत मागणी आहे तोपर्यंत भरपूर चित्रपटांतून भूमिका करायच्या. रग्गड पैसा कमवायचा. असे एक विचित्र व्यसन अनेकांच्याबाबतीत पाहायला मिळते. परंतु नाना पाटेकर हे असे अभिनेते होते की, नाना प्रकारची गुणसंपदा असताना त्यांनी अतिशय मोजक्या चित्रपटांमधून भूमिका केल्या. आणि त्या चित्रपट, नाटकांमधल्या सगळ्या भूमिका चिरकाल स्मरणात राहतील अशा पद्धतीने साकारही केल्या. त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांमध्ये ‘क्रांतीवीर’, ‘परिंदा’, ‘खामोशी’, ‘अग्निसाक्षी’, अशा काही चित्रपटांचा समावेश होता. जवळपास तीन राष्ट्रीय फिल्म अवॉर्ड, राज्याचे पुरस्कार आणि राज कपूर यांच्या नावाने दिला जाणारा विशेष पुरस्कारही होता. त्यांचा पद्मश्री पुरस्कारानेही सन्मान केला. मराठी रंगभूमीचा हिरा चित्रपट, नाटक किंवा मनोरंजनाची ही दुनिया खूप निसरडी असते. प्रसिद्धीच्या लाटेसोबत वाहत जाणाऱ्यांची संख्या प्रचंड असते. परंतु नाना पाटेकर हे एकमेव असे अभिनेते ठरतात की, त्यांनी या क्षेत्रात राहून प्रवाहाविरुद्ध प्रवास केला. भूमिका स्वीकारताना आपला स्वभाव, व्यक्तिमत्व म्हणजेच स्वतःतल्या कलागुणांशी प्रतारणा होणार नाही याची त्यांनी नेहमीच कटाक्ष ठेवून काळजी घेतली. खरे सांगायचे तर नाना पाटेकर हे मराठी रंगभूमीचे रत्न म्हणावे लागेल. चाळीस वर्षापूर्वी नाट्यसृष्टीच्या समर्पित अभिनेत्री म्हणून विजयाबाई मेहतांचं नाव घेतलं जातं. त्यांच्या रंगायन नाट्य संस्थेशी नाना जोडले गेले आणि त्यांना हा हिरा गवसला. त्यांना नाना पाटेकरांमधला सशक्त अभिनय लक्षात आला. आणि ‘हमिदाबाईची कोठी’ या नाटकातून नानांच्या अभिनयाची लोकप्रियता पसरायला सुरुवात झाली. ‘पुरुष’ नाटकातला त्यांचा अभिनय हा सर्वाधिक गाजला. ज्यामध्ये गुलाबराव ही खलनायकाची भूमिका करूनही ते नाटक यशस्वी करणारे नायक ठरले होते. तब्बल १७०० प्रयोग होणारे हे मराठीतले एकमेव नाटक ठरले. ‘डॉ. बाबा आमटे’, या चित्रपटातला त्यांचा अभिनय हा कलाकारातल्या सामाजिक संवेदनशीलतेची आगळीवेगळी ओळख करून देणारा होता. त्यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही भूमिका स्वीकारताना त्या व्यक्तीरेखेचा सखोल अभ्यास ते करायचे. आवाजातले चढ–उतार आणि त्यानुसार त्यांच्याकडून होणारी संवादफेक ही जितकी महत्त्वाची ठरली तितकीच संवादाशिवाय देहबोलीतून अभिनयाला अधिक जिवंत करणारे नाना पाटेकर हे निश्चितच आगळेवेगळे अभिनेते ठरतात. १९७८ मधल्या ‘गमन’ या हिंदी चित्रपटातून त्यांचा नवा प्रवास सुरू झाला. त्याच काळात म्हणजे १९७९ मध्ये ‘सिंहासन’ हा पाटेकरांचा पहिला मराठी चित्रपट होता. आणि ‘नटसम्राट’ चित्रपटातून त्यांनी अभिनयातली अतिशय प्रगल्भ अदाकारी सादर केली होती. त्यांचे वडील चित्रकार होते. मुरूड जंजिरातला त्यांचा जन्म, त्यांनी स्वतः चित्रकलेचे जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये शिक्षणही घेतले होते. पण आपल्या आयुष्यात अभिनयाचे गहिरे रंग भरणारा वेगळ्या अर्थाने हा माणूसकी जपणारा मानसीचा चित्रकारच म्हणावा लागतो. जमिनीशी नाते असलेले साधारणपणे नाटक, चित्रपट, दूरदर्शन किंवा टीव्ही, आणि आता प्रचंड प्रस्थ असलेल्या ओटीटीच्या माध्यमावर अभिनेत्यांची घाऊक उपस्थिती पाहायला मिळते. परंतु अभिनय शब्दातल्या जिवंतपणाला जागवण्याचे मर्म अतिशय मोजक्याच लोकांना कळते. त्यात नाना पाटेकरांचा समावेश होतो. एकीकडे वेगवेगळ्या भूमिका साकार करत असताना एक व्यक्ती म्हणून, देशाचा एक जागरूक नागरीक म्हणून आणि मराठी भाषेचा तितकाच अभिमानी म्हणून पाटेकरांनी आपल्या जबाबदाऱ्या ओळखल्या. सैनिकांविषयी त्यांच्या मनात असलेले आकर्षण आणि मग सैनिकांमध्ये जाऊन राहण्याची त्यांची जिद्द किंवा ‘नाम’ फाऊंडेशन स्थापन करून अगदी अतिशय साध्या राहणीमानातून शेतकऱ्यांमध्ये मिसळून राहणारे नाना पाटेकर आठवतात तेव्हा अभिनेत्यामागची ही संवेदनशील अभिव्यक्ती किती उच्च दर्जाची होती याची खात्रीदेखील पटते. या क्षेत्रात राहून उथळपणा, सवंगपणा किंवा आपल्या पैसा प्रसिद्धीचे ओंगळवाणे प्रदर्शनही केले जात असते. परंतु यापासून नाना कटाक्षाने दूर राहिले. एकाअर्थी लोकप्रियतेचे सर्वोच्च शिखर गाठूनही त्यांचे मातीशी असलेले नाते कायम राहिले होते. अभिनेते म्हणून ते जेवढे मोठे ठरतात तितकेच संवेदनशील माणूसकी जपणारे म्हणूनही ते विशेषत्वाने लक्षात राहतात. आपल्या कलागुणांशी प्रामाणिक राहणे आणि नैतिक बळावरच्या निष्ठांना प्राधान्य देणे यासाठी त्यांना कुठल्याही प्रकारची हुजरेगिरी मान्य नव्हती. आपल्या स्पष्ट बोलण्याने अनेक दिग्गजांना खडे बोल सुनावले होते. आणि ते लोक नाराजही झाले होते. आईवरचे निरातिशय प्रेम आणि गणपती बाप्पांवरची त्यांची श्रद्धा नानांमधल्या भक्तीभावाचा पैलू दर्शवणारे होते.

# गोंदियात आरबीएसके योजनेचा मोठा दिलासा

## ७ चिमुरड्यांवर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया, मिळाले नवीन जीवनदान!



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**गोंदिया:–** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (RBSK) गोंदिया जिल्ह्यातील जन्मजात हृदयविकार असलेल्या ७ चिमुरड्यांवर गोंदिया येथील होप हार्ट हॉस्पिटलमध्ये अत्यंत गुंतागुंतीच्या हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या आहेत. या यशस्वी मोहिमेमुळे या बालकांना नवीन जीवनदान मिळाले असून त्यांच्या कुटुंबांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने ग्रामीण व दुर्गम भागातील बालकांसाठी विविध आरोग्य मोहिमा राबविल्या जातात. 'RBSK' पथकाद्वारे जिल्ह्यातील अंगणवाड्या आणि शाळांमधील बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली होती. या तपासणी दरम्यान जिल्ह्यातील ७ बालकांमध्ये जन्मजात हृदयविकाराचे गंभीर निदान झाले होते.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचे थेट मार्गदर्शन व देखरेख:–**

या संपूर्ण मोहिमेसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे व आरबीएसके जिल्हा समन्वयक संजय बिसेन यांचे विशेष मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले असून, त्यांच्याच थेट देखरेखीखाली ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत यशस्वीपणे राबवली गेली.

**आंतरराष्ट्रीय दर्जाचे वैद्यकीय उपचार:–**

बालकांचे आजारपण लक्षात घेऊन जिल्हा आरोग्य प्रशासनाने तातडीने पावले उचलली. ‘सेवा संकल्प’ अभियानातून या सर्व बालकांना पुढील उपचारासाठी गोंदियातील नामांकित होप हार्ट हॉस्पिटल येथे संदर्भित करण्यात आले होते. या शस्त्रक्रियेसाठी अपोलो हॉस्पिटल, मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टरांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच गोंदियातील प्रसिद्ध हार्ट स्पेशालिष्ट डॉ. प्रमेश गायधने आणि त्यांच्या वैद्यकीय चमूने या अत्यंत आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या.

**नवीन जीवनदान मिळालेली बालके:–** १) विहान हरिणखेडे (छोटा गोंदिया), २) दिपक चंदानिया (यादव चौक), ३) लक्ष मरस्कोल्हे (निलागोंदी), ४) पुर्वी रहांगडाले (काटी), ५) निक फुंडे (कुडवा), ६) स्नेहा मेश्राम (बोळदे, बाराभाटी), ७) केशव वडगाये (नवाटोला).

**गरीब कुटुंबांना लाखांच्या खर्चातून मुक्ती:–**

हृदयाशी संबंधित या शस्त्रक्रिया अत्यंत खर्चिक असतात आणि खाजगी रुग्णालयात यासाठी लाखो रुपयांचा खर्च येतो. मात्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (RBSK) या सर्व शस्त्रक्रिया आणि पुढील उपचार पूर्णपणे मोफत करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि ग्रामीण भागातील कुटुंबांसाठी ही योजना खऱ्या अर्थाने वरदान ठरली आहे. सर्व सातही बालकांची प्रकृती आता वेगाने सुधारत असून, आरोग्य विभागाचे पथक आणि रुग्णालयाचे कर्मचारी त्यांच्यावर सातत्याने लक्ष ठेवून आहेत.

# ‘आरोग्यदूत धावले बिडी कामगारांच्या दारी! खमारी उपकेंद्रात ‘सेवा संकल्प अभियान’ यशस्वी’

## खमारी उपकेंद्रात बमलेश्वरी बिडी कामगारांसाठी ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत आरोग्य शिबिर संपन्न





**दै. लोकजन वृत्तसेवा**

**गोंदिया:–** गोंदिया तालुक्यातील उपकेंद्र खमारी अंतर्गत ‘बमलेश्वरी बिडी उत्पादन औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, गोंदिया’ च्या बिडी कामगारांसाठी गोंदिया तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलेश जाधव व प्राथमिक आरोग्य केंद्र खमारीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कुंदन मेश्राम यांचे संकल्पनेतुन २८ सप्टेंबर रोजी ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत विशेष आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात कामगारांची बीपी (रक्तदाब), शुगर (मधुमेह), मुखरोग तपासणी, क्षयरोग आणि आरोग्य समुपदेशन करण्यात आले.

बिडी कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना सतत तंबाखूच्या संपर्कात राहावे लागते, ज्यामुळे त्यांना विविध आरोग्य समस्यांचा सामना करावा लागतो. हीच बाब लक्षात घेऊन ‘सेवा संकल्प अभियाना’ चे औचित्य साधत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**आरोग्य पथकाचे योगदान:–**

या शिबिरात खमारी उपकेंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. मयुर टेंभुर्णे यांनी उपस्थित कामगारांची वैद्यकीय तपासणी केली आणि त्यांना आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. यासोबतच खमारी कार्यक्षेत्रातील आशा सेविकांनी शिबिराच्या नियोजनात आणि कामगारांच्या तपासणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत उत्तम आरोग्य सेवा दिली.

**शिबिरातील प्रमुख तपासण्या व उपक्रम:–**

**रक्तदाब व मधुमेह तपासणी:–** शिबिरात सर्व बिडी कामगारांची मोफत रक्तशर्करा आणि रक्तदाब/बी.पी. तपासणी करण्यात आली. ज्या कामगारांमध्ये उच्च रक्तदाब किंवा मधुमेहाची लक्षणे आढळली, त्यांना पुढील उपचारासाठी योग्य सल्ला देण्यात आला.

**मुखरोग तपासणी व कॅन्सर प्रतिबंध:–** तंबाखूच्या धुळीमुळे आणि संपर्कामुळे होणाऱ्या तोंडाच्या आजारांचे निदान करण्यासाठी डॉ. मयुर टेंभुर्णे यांनी कामगारांच्या तोंडाची सखोल तपासणी केली. तोंडाचा कर्करोग कसा टाळावा, याबद्दल विशेष मार्गदर्शन करण्यात आले.

**आरोग्य समुपदेशन:–** कामगारांना व्यसनमुक्ती, सकस आहार, कामाच्या ठिकाणी घ्यावयाची काळजी आणि वैयक्तिक स्वच्छता यावर समुपदेशन करण्यात आले.

या आरोग्य शिबिराचा लाभ ‘बमलेश्वरी बिडी उत्पादन औद्योगिक सहकारी संस्थेच्या’ बहुसंख्य महिला व पुरुष कामगारांनी घेतला. खमारी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील नागरिकांनी आणि कामगारांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले आहे.

# एस.एस. गर्ल्स कॉलेजमध्ये सर्टिफिकेट कोर्सचा समारोप व प्रात्यक्षिक मूल्यमापन संपन्न



दै. लोकजन वृत्तसेवा

गोंदियाः– गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचलित एस.एस. गर्ल्स कॉलेजमध्ये गोंदिया शिक्षण संस्थेचे संरक्षक प्रफुलभाई पटेल, अध्यक्षा वर्षा पटेल, सचिव राजेंद्र जैन, डायरेक्टर निखिल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. शारदा महाजन यांच्या नेतृत्वात "Certificate Course in Traditional Garba & Folk Dance" चे आयोजन करण्यात आले होते.

हा कोर्स विद्यार्थ्यांना भारतीय लोकसंस्कृतीशी जोडण्यासोबतच त्यांच्यामध्ये सर्जनशीलता, स्वयंरोजगार कौशल्य, आत्मविश्वास आणि मंच कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आला होता.

कोर्सच्या समारोप प्रसंगी प्रात्यक्षिक कार्यांतर्गत विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषेत गरबा आणि लोकनृत्याचे आकर्षक सादरीकरण केले. मूल्यमापनामध्ये शारदा ग्रुपने प्रथम, आद्या शक्ती ग्रुपने द्वितीय तर रास राणी ग्रुपने तृतीय क्रमांक पटकावला.

कोर्स पूर्ण करणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व पुरस्कारांचे वाटप करण्यात आले. विजेत्या संघांना ‘दैनिक भास्कर’ चे डिस्टिक्ट कोऑर्डिनेटर संतोष शर्मा व ‘देशोन्नती’ चे रिपोर्टर महेंद्र बिसेन यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून दीपा भौमिक व आशा रावते यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात आयोजन समितीचे डॉ. जी.ए. भालेराव, डॉ. आय.जी. खटवाणी, डॉ. जे.डी. पुंडे, डॉ. गायधने व डॉ. गेडाम यांचे विशेष योगदान राहिले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन डॉ. जी.ए. भालेराव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. दिशा गेडाम यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदाने मोलाचे सहकार्य केले.

# तिरोड्यात रंगली तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धा; खेळाडूंनी दाखविले उत्कृष्ट कौशल्य



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**तिरोडा:–** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद कार्यालय, गोंदिया तसेच तिरोडा तालुका क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने तिरोडा तालुकास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेचे आयोजन २३ व २४ सप्टेंबर २०२६ रोजी तालुका क्रीडा संकुल, तिरोडा येथे करण्यात आले.

या स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षांखालील मुला–मुलींच्या वयोगटात विविध शाळांमधील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. खेळाडूंनी कराटेतील विविध कौशल्यांचे प्रभावी प्रदर्शन करीत आत्मविश्वास, शिस्त व क्रीडाभावनेचे दर्शन घडविले. विविध सामन्यांमध्ये चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या.

स्पर्धेचे उद्घाटन दीपक घरजारे, संस्थापक, मल्टीपर्पस स्पोर्ट्स अँड हेल्पिंग ग्रुप, तिरोडा यांच्या हस्ते झाले. त्यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानाची जबाबदारीही पार पाडली. त्यांच्या उपस्थितीने सहभागी खेळाडूंचा उत्साह वाढला. स्पर्धेतील विजयी व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची गोंदिया येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अभय मल्ले, तालुका क्रीडा अधिकारी, तिरोडा व अमन नंदेश्वर, तालुका क्रीडा संयोजक, तिरोडा यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेत पंच व क्रीडा शिक्षक म्हणून चंद्रप्रकाश प्रजापती, मुकेश शेंडे, आकाश शहारे, राजेश वरठे, प्रज्वल वैद्य, प्रशिक वैद्य व अतुल बिनझाडे यांनी जबाबदारी पार पाडली. क्रीडा शिक्षक शैलेश बघेले, उमेश ढवळे, हेमतकुमार पारधी इतर क्रीडाशिक्षक व शिक्षकवृंदांनी विजयी व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्वाधार योजनेच्या अर्जासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

## पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज व नूतनीकरण प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**गोंदिया:–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना अर्ज व नूतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी http://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

जिल्ह्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत एकूण आठ शासकीय वसतिगृहे सुरू आहेत. यामध्ये मुलांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह गोंदिया व अर्जुनी मोरगाव येथे, तर मुलींसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहे गोंदिया, नवीन गोंदिया (कुडवा), तिरोडा, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव व देवरी येथे कार्यरत आहेत. या वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास, नाश्ता, भोजन व शैक्षणिक साहित्य यांसारख्या आवश्यक सुविधा विनामूल्य पुरविण्यात येतात.

व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी १० ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करूनही प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील पात्र विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेता येतो. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेला असल्याची खात्री करावी.

**स्वाधार योजनेअंतर्गत वार्षिक आर्थिक मदत:–**

या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना भोजन, निवास, निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक ४३ हजार रुपये, तर तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक ३८ हजार रुपये देण्यात येतात. ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते.

शासकीय वसतिगृह नसलेल्या तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेसाठी थेट अर्ज करता येतो. तसेच मागील वर्षी या योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी लाभ सुरू ठेवण्यासाठी नूतनीकरणाचा ऑनलाइन अर्ज १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.





**अर्जासाठी संपर्क साधण्याचे आवाहन:–**

गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी मुदतीची वाट न पाहता http://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरावेत. योजनेविषयी अधिक माहितीसाठी समाजकल्याण कार्यालयाच्या ०७१८२–२३४११७ या दूरध्वनी क्रमांकावर, acswogondia@gmail.com या ई–मेलवर किंवा कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन संपर्क साधावा, असे समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त किशोर भोयर यांनी कळिवले आहे.

# एमपीएससी आंदोलनात उपोषण सोडताच पुणे पोलिसांकडून ऋषिकेश गांगुर्डे, सोमनाथ चव्हाण, गजानन शेळकेसह १५ जणांविरोधात गुन्हा दाखल; रोहित पवार अन् विवेकानंद पाटीलचं काय झालं?

**सरकार विरोधात चितावणीखोर वक्तव्य करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि वाहतुकीस अडथळा करणे अशा विविध कलमांन्वये १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**पुणे:–** पुण्यातील एस.एम जोशी पूलावर आंदोलन करणाऱ्या १५ जणांविरुद्ध अखेर विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आंदोलन करण्यासाठी पोलिसांना पत्र दिल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, भेटीदरम्यान त्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या होत्या, त्यामुळे आंदोलन स्थगिती केल्याचे पत्र त्यांनी पोलिस आयुक्तांना दिले होते. परंतु सकारात्मक वाटाघाटी करून आल्यानंतरही कोणतीही पूर्वकल्पना न देता अचानक आंदोलन केले. सरकार विरोधात चितावणीखोर वक्तव्य करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि वाहतुकीस अडथळा करणे अशा विविध कलमांन्वये १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांमध्ये रोहित पवार यांचा समावेश नाही.

**रोहित पवार सोडून इतर १५ जणांवर गुन्हे दाखल**

* प्रमोद पाटील, * अक्षय कांबळे, * अनिकेत देशमाने, * प्रवीण महादेव पाटील, * ऋषिकेश गांगुर्डे, * प्रियंका चौधरी, * नितीन गिते, * सोमनाथ चव्हाण, * ओंकार पाटील, * गजानन शेळके, * अजित काकडे, * सिद्धार्थ पंचांगे, * संकेत कणसे, * सिद्धार्थ जांभूळकर, * साहेबराव क्षीरसागर

एस.एम. जोशी पुलाजवळ आंदोलन करण्याच्या तयारीत असलेल्या आणि सार्वजनिक रस्त्यावर आंदोलन केल्याचा आरोप असलेल्या १५ जणांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी अखेर गुन्हा दाखल केला आहे. पुण्यातील नवी पेठ परिसरातील इंदुलाल कॉम्प्लेक्ससमोर १ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. या आंदोलनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्याचा तसेच जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थी प्रतिनिधी प्रमोद पाटील आणि इतर विद्यार्थ्यांनी आंदोलनासाठी परवानगी मिळावी म्हणून २५ सप्टेंबर रोजी पुणे पोलीस आयुक्त कार्यालयात निवेदन दिले होते. अलका टॉकीज चौक, अहिल्या अभ्यासिका आणि एस.एम. जोशी पूल या तीन ठिकाणी आंदोलन करण्याचा पर्याय त्यांनी मांडला होता. चर्चेनंतर एस.एम. जोशी पुलाजवळ २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता आंदोलन करण्यासाठी अटी व शर्तीसह परवानगी देण्यात आली होती. दरम्यान, ३० सप्टेंबर रोजी विद्यार्थी आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने मुंबईत मुख्यमंत्री यांची भेट घेतली. या भेटीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली आणि मागण्या मान्य झाल्याने विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबरचे नियोजित आंदोलन स्थगित केल्याचे लेखी पत्र पोलीस आयुक्त कार्यालयाला दिले. त्यानंतर आंदोलनासाठी देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात आल्याचे पत्रही विद्यार्थ्यांना देण्यात आले होते.




**परवानगी रद्द झाल्यानंतरही आंदोलन केल्याचा आरोप**

पोलिसांच्या फिर्यादीनुसार, १ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ च्या सुमारास प्रमोद पाटील, अक्षय कांबळे, अनिकेत देशमाने यांच्यासह इतर विद्यार्थी नवी पेठेतील इंदुलाल कॉम्प्लेक्ससमोर सार्वजनिक रस्त्यावर जमले होते. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तसेच आंदोलनकर्त्यांनी रस्ता अडविण्याच्या घोषणा दिल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर विश्रामबाग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी जमावाला आंदोलन न करण्याच्या आणि सनदशीर मार्गाने मागण्या मांडण्याच्या सूचना दिल्या. पुणे शहरात लागू असलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांची तसेच नियोजित आंदोलनाची परवानगी रद्द झाल्याची माहितीही आंदोलनकर्त्यांना देण्यात आली होती. मात्र, या सूचनांकडे दुर्लक्ष करून आंदोलन सुरू ठेवल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

**१५ जणांविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा**

या प्रकरणात प्रमोद पाटील, अक्षय कांबळे, अनिकेत देशमाने, प्रवीण महादेव पाटील, ऋषिकेश गांगुर्डे, प्रियंका चौधरी, नितीन गिते, सोमनाथ चव्हाण, ओंकार पाटील, गजानन शेळके, अजित काकडे, सिद्धार्थ पंचांगे, संकेत कणसे, सिद्धार्थ जांभूळकर आणि साहेबराव क्षीरसागर या १५ जणांची नावे फिर्यादीत नमूद आहेत. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या आंदोलनामुळे परिसरात वाहतूक कोंडी झाली आणि सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण झाली. पुणे शहरात २९ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश लागू असताना तसेच शास्त्री रोड आणि परिसरात आंदोलन, सभा, मोर्चे व रास्ता रोको करण्यास निर्बंध असताना आंदोलन केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १८९(२), १८९(३), १८९(५), १२६(२), २२३, २७० आणि २९२, तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ३७(१), ३७(३), १३५, ११२ आणि ११७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) विकास भिंगारदिवे करीत आहेत.

# महायुतीत पुण्यातून भाजपच फायनल, शिक्षक मतदारसंघातून माघार; शिवसेनेच्या मंगेश चिवटेंची पहिली प्रतिक्रिया

**भाजपने पुणे शिक्षक मतदारसंघातुन कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, शिवसेनेकडून मंगेश चिवटे यांनी देखील अर्ज दाखल केलाय.**

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**पुणे:–** राज्यातील विधानपरिषदेच्या पाचही जागांसाठी उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी आज शेवटचा दिवस आहे. त्या पार्श्वभूमीवर बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांचे अर्ज माघारी घेतले जात आहेत. महायुतीमध्ये पुणे शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेच्या मंगेश चिवटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीत मोठी अडचण निर्माण झाली होती. तर, पुणे पदवीधरमधून राष्ट्रवादीच्या प्रताप भैय्या माने यांच्या उमेदवारीमुळे भाजपची ASMU झाली होती. अखेर महायुतीमधील दोन्ही उमेदवारांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. त्यानंतर, मंगेश चिवटेंनी माध्यमांशी बोलताना पहिली प्रतिक्रिया दिली.

भाजपने पुणे शिक्षक मतदारसंघातुन कौस्तुभ गावडे यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, शिवसेनेकडून मंगेश चिवटे यांनी देखील अर्ज दाखल केलाय. तर पदवीधर मतदारसंघातून भाजपने स्मिता जाधव यांना उमेदवारी दिलीय मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या भैय्या माने यांनी बंडखोरी केली होती. अखेर, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी भैय्या मानेंची समजूत काढल्यानंतर त्यांनी आपला अर्ज माघारी घेतला. तर, वरिष्ठांच्या आदेशानंतर मंगेश चिवटे यांनीही आपली उमेदवारी मागे घेतली आहे. त्यानंतर, माध्यमांशी बोलताना त्यांनी थोडक्यात प्रतिक्रिया दिली.




मंगेश चिवटे यांनी उमेदवारी अर्ज माघारी घेतल्यानंतर माध्यमांनी त्यांना यासंदर्भात प्रश्न विचारला होता. त्यावर, पक्षाचे वरिष्ठ नेते यावर भाष्य करतील, मी लहान कार्यकर्ता आहे अशी प्रतिक्रिया मंगेश चिवटे यांनी दिली. त्यामुळे, शिवसेना पक्षाचे अधिकृत प्रवक्ते किंवा उपमुख्यमंत्री तथा मुख्य नेते एकनाथ शिंदे काय प्रतिक्रिया देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या भैय्या मानेंची प्रतिक्रिया**

नेमकं कारण काय माघार घेण्याचं? शक्ती प्रदर्शन कार्यकर्त्यांची भावना होती, जिवंतपणा जो कार्यकर्ता असतो, त्याच्यातून ते शक्ती प्रदर्शन झालेलं होतं, दबाव काही नाही, पण महायुती म्हणून मला काल हसन मुश्रीफ भेटले, जनस्वराज्याचे विनय कोरे, सुमित कदम त्यांनी विनंती केली की या सगळ्या परिस्थितीमध्ये आपण अपक्ष निवडणूक लढवून आपण महायुतीत थोडासा गोंधळ आणि त्यामुळे आपण माघार घ्यावी आणि त्यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत मी मागे घेतलं आहे. मी माघार घेतल्याने नक्कीच महायुतीला फायदा होईल, मला आश्वासन वगैरे काही दिलेलं नाही.

दरम्यान, पुणे शिक्षक मतदारसंघातून माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनीही आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे, आता महायुती विरुद्ध, महाविकास आघाडी विरुद्ध अपक्ष असा सामना पाहायला मिळू शकतो. दरम्यान, सचिन सानप यांच्या भूमिकेकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमरावती शिक्षक मतदार संघात २६ उमेदवार रिंगणात; महंत सुनील महाराजांसह अखेर महायुतीमधील तिघांची माघार

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**अमरावती:–** राज्यात विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झला असून आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्याच पार्श्वभूमीवर महायुतीत भाजपाकडून बंडखोर उमेदवारांची मनधरणी करण्यात येत आहे. राज्यातील ५ पैकी दोन मतदारसंघ शिक्षक आमदारांसाठी असून तीन मतदारसंघ हे पदवीधरचे आहेत. त्यामध्ये, पुणे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघात आज उमेदवारीचे अंतिम चित्र स्पष्ट झालं आहे. त्यात, पुण्यातूनही महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादीने माघार घेतली. तर, अमरावती येथेही महायुतीतून तीन बंडखोरांनी आपले अर्ज मागे घेतल्याने शिवसेनेला मोठा दिलासा मिळाला आहे.

अमरावती शिक्षक मतदारसंघातून पोहरादेवी येथील महंत सुनील महाराज चव्हाण, रवी राणांच्या युवा स्वाभिमान पक्षाच्या प्रीती रेवने आणि आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार सामाजिक संघटनेचे नितीन आगे यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे, महायुतीकडून शिवसेनेचीच उमेदवारी अंतिम झाली आहे. याशिवाय अपक्ष उमेदवार सजील खान यांनीही आपाला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. आता, अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी एकूण २६ उमेदवार रिंगणात आहेत.

अमरावती शिक्षक मतदार संघ महायुतीतून शिवसेना (शिंदे) विद्यमान आमदार किरण सरनाईक यांना शिवसेनेनं उमेदवारी दिली आहे. तर, काँग्रेसकडून अदिती ऋषिकेश पोहरे यांना उमेदवारी देण्यात आलीय. तर शिवसेना ठाकरे गटाकडून दत्तात्रय लहाने हे अधिकृत उमेदवार आहेत. त्यामुळे, येथील मतदारसंघात तिहेरी लढत निश्चित मानली जाते. महायुतीकडून शिवसेना उमेदवार किरण सरनाईक हे फायनल आहेत.

**अमरावतीत महायुतीतील हे उमेदवार बंडखोरीवर कायम**

१) संगीता सचिंद्र शिंदे-बोंडे (भाजप खासदार अनिल बोंडे यांच्या भगिनी), २) शेखर भोयर (भाजप, आमदार राजेश वानखडे यांचे मेहुणे.), ३) श्रीकांत देशपांडे माजी आमदार तथा शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, ४)सुमित पवार, भाजपा पदाधिकारी

**पुण्यात मंगेश चिवटेंची माघार**

दरम्यान, दुसरीकडे पुणे शिक्षक मतदारसंघातून महायुतीमधील शिवसेनेच्या मंगेश चिवटे आणि राष्ट्रवादीच्या प्रताप माने यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे, येथे भाजप उमेदवार कौस्तुभ गावडे हेच महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून निश्चित झाले आहेत. मात्र, येथेही माजी आमदार दत्तात्रय सावंत, सचिन सानप यांच्यासह अनेक उमेदवारांचे आव्हान भाजप महायुतीला आहे. तर, महाविकास आघाडीकडून काँग्रेस उमेदवार जयंत आसगावकर हे उमेदवार असल्याने येथेही तिहेरी लढत मानली जाते.

# आदित्य ठाकरे म्हणाले, देशात आणीबाणी; म्हणाले, लोकांना ताब्यात घेतलं, नोटीस बजावल्या, रेल्वे रद्द, मेट्रो बंद

**देशात आता अप्रत्यक्ष आणीबाणी चालू आहे, भाजप यावर बोलत नाही. मुंबई आणि महाराष्ट्राची यांना भीती आहे, लोकांना ताब्यात घेत आहेत, नोटिसा पाठवत आहे.**

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**मुंबई:–** देशभरात सध्या आंदोलनाचीच चर्चा असून महाराष्ट्रातील पुणे शहरात एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने वातावरण तापलं असताना, दुसरीकडे राजधानी दिल्लीत काँग्रेसही आक्रमक झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन सुरू केले आहे. त्याच पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दिल्ली सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले असून काही मार्गांवर रेल्वे, मेट्रो बंद करण्यात आले असून पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात आहे. आता, त्यावरुन शिवसेना उबाठा पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरेंनी सरकारवर हल्लाबोल केला आहे.

देशात आता अप्रत्यक्ष आणीबाणी चालू आहे, भाजप यावर बोलत नाही. मुंबई आणि महाराष्ट्राची यांना भीती आहे, लोकांना ताब्यात घेत आहेत, नोटिसा पाठवत आहे. या देशात आणीबाणी लागू केली आहे, याबाबत बोलायची हिंमत नाही, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी केंद्रातील मोदी सरकारवर हल्लाबोल केला. दिल्लीतील आंदोलनास आम्हीही पाठिंबा दिलेला आहे, आमचे नेते संजय राऊत दिल्लीत आहेत, गद्दार ज्ञानेश कुमार गेलेच पाहिजेत. पुण्यात हजारो आंदोलक बसले आहेत, त्यांचा घरीही दुष्काळाची झळ आहे. मात्र, पेपर फोडणाऱ्याला हे काढत नाहीत. मुख्यमंत्री आपल्या मित्राला का वाचवत आहेत? असा सवाल करत आदित्य ठाकरेंनी विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्यावर भाष्य केलं.

शिवसेना पक्ष आणि चिन्हाची लढाई मागील ४ महिन्यांपासून सुरू आहे. मात्र, आता कुठे तरी वाटू लागलं आहे, न्याय मिळायला उशीर होईल पण न्याय मिळेल अशी अपेक्षाही आदित्य ठाकरेंनी व्यक्त केली.

**दिल्लीत कॉकोरच जनता पार्टीचं आंदोलन**

ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 'कॉकरोच पार्टी' १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत आंदोलन करणार आहे. २ ऑक्टोबरच्या रात्री, दीपके यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, जर ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिला नाही, तर देशभरातील कॉकरोच दिल्लीत पोहोचतील. त्याने असेही म्हटले की, जर दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना जंतर मंतरपर्यंत पोहोचण्यापासून रोखले, तर त्यांना जिथे थांबवले जाईल तिथे जंतर मंतर उभारले जाईल.




**दिल्लीत काही मेट्रो आणि मेल एक्सप्रेस रद्द**

नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन स्थानकांवर येणाऱ्या सर्व मेल आणि एक्सप्रेस गाड्या उद्या रद्द करण्यात येतील. रेल्वेने या गाड्या त्यांच्या मूळ स्थानकांवरूनच रद्द केल्या आहेत. सीजेपी आणि डाव्या विचारसरणीच्या संघटनांनी सरकारवर देशभरात समर्थकांना ताब्यात घेतल्याचा आरोप केला आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ५७ मेट्रो स्थानके बंद करण्याचा आणि १० नजरबंदी केंद्रे उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

# ज्ञानासाठी गुंतवणूक हाच आपला विकासमंत्र – आ. अभिजित वंजारी

**२५० वाचनालये आणि १३०० शाळा–महाविद्यालयांना डिजिटल साधनांचा लाभ; ब्रह्मपुरीत काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक**

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**ब्रह्मपुरी (चंद्रपूर):–** शिक्षण आणि ज्ञानातील गुंतवणूक हीच समाजाच्या प्रगतीची खरी पायाभरणी आहे. पदवीधर मतदारसंघाचा आमदार म्हणून मिळालेल्या निधीतून उद्याचे विद्यार्थी घडविण्याला आपण प्राधान्य दिले. त्यामुळे आमदार म्हणून मिळणारा निधी हा ज्ञानासाठीची गुंतवणूक आहे, असे प्रतिपादन नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा काँग्रेस-महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित वंजारी यांनी केले.

ब्रह्मपुरी येथील आरमोरी मार्गावरील झाडे मीटिंग हॉलमध्ये आयोजित काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या सहाही जिल्ह्यांमध्ये विकासकामांना गती मिळावी, यासाठी आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात सातत्याने पाठपुरावा केल्याचे वंजारी यांनी सांगितले.

समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवणे गरजेचे आहे. याच भावनेतून आपल्या कार्यकाळात २५० सार्वजनिक वाचनालयांना स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त आधुनिक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. तसेच सुमारे १३०० शाळा व महाविद्यालयांना संगणक संच



देऊन डिजिटल शिक्षणाला बळकटी देण्याचा प्रयत्न केला, असे वंजारी यांनी सांगितले.

आमदारकीच्या मागील सहा वर्षांत केलेली ही ज्ञानोपयोगी कामे मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. पदवीधर मतदारसंघातील प्रत्येक जिल्ह्यातील पदवीधरांपर्यंत विकासकामांची माहिती पोहोचवून त्यांचा विश्वास संपादन करा. ज्ञान, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी अधिक सक्षम करण्यासाठी आपली भूमिका स्पष्टपणे मतदारांसमोर मांडा, असेही त्यांनी सांगितले.

**काँग्रेसला पुन्हा संधी देण्याचा विश्वास**

बैठकीपूर्वी ब्रह्मपुरी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आमदार अभिजित वंजारी यांचे स्वागत करण्यात आले. मागील निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसच्या उमेदवाराला कौल देत वंजारी यांना संधी दिली. या संधीचे त्यांनी आपल्या कामातून सोने केले असून, ज्ञानाच्या या यज्ञात यंदाही प्रत्येक मतदार आपली मतरूपी समिधा टाकेल, असा विश्वास काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

आमदार वंजारी यांनी सहाही जिल्ह्यांमध्ये शिक्षण आणि ज्ञानाला प्राधान्य देत केलेली कामे पदवीधर मतदारांच्या हिताची आहेत. ही कामे मतदारांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्ते जीवाचे रान करतील, असा विश्वास ब्रह्मपुरी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी ब्रह्मपुरी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहराध्यक्ष बाळूभाऊ राऊत, माजी प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे, प्राचार्य डॉ. रमेश कांबळे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर, प्राचार्य डॉ. एन.एस. कोलोडे, प्रदेश सचिव डॉ. ज्ञानेश्वर कायरकर, माजी सभापती नेताजी मेश्राम, खो.रि.पा.चे राज्य सरचिटणीस बागडे, नगराध्यक्ष योगेश मिसार, नगरपरिषद उपाध्यक्ष नितीन उराडे, महिला काँग्रेस तालुका अध्यक्ष सौ. मंगला लोनबले, महिला काँग्रेस शहराध्यक्ष सौ. योगिता आमले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात आणखी ३६ तालुके दुष्काळाच्या यादीमध्ये समाविष्ट होणार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती; ग्राउंड ट्रूथिंगबद्दलही मोठा निर्णय

**मला विश्वास आहे की पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषीमंत्री यांच्या प्रयत्नांनी एक मोठा सपोर्ट महाराष्ट्राला मिळेल, असेही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.**

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**नागपुरः–** मागच्या कॅबिनेट सबकमिटीमध्ये १८ तालुक्याबद्दलच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, त्यावर २० टक्के ग्राउंड ट्रूथिंग सर्वेक्षण करावं आणि दुष्काळाच्या यादीमध्ये यांचाही समावेश घेऊ ग्राउंड ट्रूथिंग करता येऊ शकतो, असा शासन निर्णय मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने ९ ऑक्टोंबर रोजी आपण काढलेला आहे. सोबतच १८ तालुक्यांची पुन्हा एक यादी आली आहे, त्यावर अहवाल मागितलेला आहे. अहवाल आल्यानंतर त्याचाही ग्राउंड ट्रूथिंग करू आणि त्यावर निर्णय घेऊ. असे महत्वाचं विधान राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. सोबतच ३६ तालुके या ठिकाणी पुन्हा सर्वेक्षणासाठी आम्ही पाठवले आहेत. २६५ पैकी आणखी ३६ तालुके हे कॅबिनेट सबकमिटीमध्ये आले आहेत, माझ्याही प्रवासात याबद्दलचे निवेदन आले होते. लोकप्रतिनिधी बांधावर गेले होते या सर्वांनी शिफारशी केल्या होत्या. या संदर्भात आता मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या, असेही ते म्हणाले.

**पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषीमंत्री यांच्या प्रयत्नांनी मोठा सपोर्ट महाराष्ट्राला मिळेल**

केंद्र सरकारचे दुष्काळ पथक महाराष्ट्रातील परिस्थितीची पाहणी करत आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रातील दुष्काळाची दखल घेतली आहे असून तातडीने पथक पाठवले आहे. या तीनही टीम महाराष्ट्राचे सर्वेक्षण करतील. मला विश्वास आहे की पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषीमंत्री यांच्या प्रयत्नांनी एक मोठा सपोर्ट महाराष्ट्राला मिळेल, असेही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. विधान परिषद निवडणूकीतील बंडखोरी बाबत



बोलायचं झालं तर, आमचा प्रयत्न आहे की भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता हा निवडणुकीत बंडखोरी करू नये, असा आमचा प्रयत्न आहे. त्या उपरही बंडखोरी झाली तर त्यांच्याबद्दल काय चर्चा करायची, काय निर्णय घ्यायचा, याबद्दलच्या सर्व अधिकार प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आहेत, ते घेतील असेही ते म्हणाले.

**पक्ष आपल्या आईसारखा असतो, पक्षाविरुद्ध भूमिका अनिल सोले घेणार नाही**

नागपुरात अनिल सोले बंडखोरीच्या भूमिकेत आहे. यावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मागच्यावेळी आमची चर्चा झाली होती, बैठकी झाली होती. आम्हाला वाटलं होतं की ते फॉर्म भरणार नाही. मात्र त्यांनी फॉर्म भरला, आमची त्यांना विनंती आहे की अनिल सोले यांनी या निवडणुकीत अधिकृत उमेदवाराच्या विरुद्ध लढू नये, सुधाकर कोहळे यांना पक्षाने उमेदवारी दिलेली आहे. मलाही एकदा थांबवण्यात आले होते, नंतर मला पुन्हा तिकीट दिलं, पक्ष आपल्या आईसारखा असतो, त्यामुळे मला असं वाटतं की पक्षाविरुद्ध भूमिका अनिल सोले घेणार नाही. तीन वाजेपर्यंत ते विड्रॉ करतील, अशी मला अपेक्षा आहे, असेही महसूलमंत्री म्हणाले.

**मी माझंही उदाहरण दिलं. मलाही पक्षाने उमेदवारी दिली नव्हती, पण....**

तर कारवाईचा अधिकार मला नाही. तो पक्षाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना आहे. त्यावर ते निर्णय घेतील. परंतु माझी अजूनही विनंती आहे की कमी जास्त पक्षात होत असतं, मी माझंही उदाहरण दिलं. मला उमेदवारी दिली नाही. मात्र २०२४ ला दिले, नव्या कार्यकर्त्याला उमेदवाराला तिकीट दिली, यावेळी सुधाकर कोहळे यांना तिकीट दिली आहे. मला वाटतं अनिल सोले प्रगल्भ नेते आहेत. मला वाटतं की त्यांनी पक्षाविरुद्ध कुठलाही निर्णय करू नये, अशी विनंती त्यांना आहे, असेही महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले.

# करंजेकर कॉलेजमध्ये मतदान जनजागृती अभियान

***१८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहन**

***मताधिकाराच्या महत्त्वाबाबत मार्गदर्शन**



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**साकोली :–** लोकशाही व्यवस्थेत मतदानाचे महत्त्व अधोरेखित करत वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था संचालित करंजेकर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, साकोली येथे मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी तसेच मतदार ओळखपत्र काढण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मतदान हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा महत्त्वपूर्ण घटनात्मक अधिकार व लोकशाहीतील जबाबदारी असल्याचे सांगण्यात आले. प्रत्येक मताला लोकशाही प्रक्रियेत महत्त्व असून, योग्य माहिती घेऊन आणि आपल्या विवेकबुद्धीने मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास पोटोडे यांनी आपल्या संबोधनात सांगितले की, ''१८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाने आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदार ओळखपत्र प्राप्त करून घ्यावे आणि आपल्या मताधिकाराचा जबाबदारीने वापर करावा. मतदान करणे ही केवळ अधिकाराची बाब नसून लोकशाही मजबूत करण्यातील नागरिकांची जबाबदारी आहे.''

या अभियानादरम्यान १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीसाठी आवश्यक अर्ज भरून देण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज पूर्ण करून ते संबंधित मतदान अधिकाऱ्यांकडे जमा केले. त्यामुळे नवमतदारांमध्ये मतदान प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करण्यास मदत झाली.

कार्यक्रमाला आशीष भिवगडे, अरुण उपरीकर, निश्चल राऊत, हेमंत आंबेडारे, सूरज बोधनकर, राकेश पेटकर, निलेश दाने यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती अभियानाला सकारात्मक प्रतिसाद देत मतदार नोंदणी प्रक्रियेत सहभाग नोंदविला.

## गटशिक्षणाधिकाऱ्यांनी हातात खडू घेऊन वर्गात घेतला क्लास



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**साकोली :–** गुरुवार दि. ८ ऑक्टोबर ०२६ ला कृष्णमुरारी कटकवार हायस्कूल साकोली येथे साकोली पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्रीकांत पेंदाम यांनी अचानक भेट दिली. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी हातात खडू घेऊन वर्गात क्लास घेऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत आकलन क्षमता, लेखन, वाचन क्षमता, शैक्षणिक गुणवत्ता तपासणी, साकोली तालुक्यातील अनेक शाळांमध्ये त्यांनी भेटी दिल्या तज्ञ शिक्षकाप्रमाणे ते प्रत्येक शाळेतील वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना शिकवून त्यांच्यातील शैक्षणिक क्षमता तपासतात. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात एक चांगले अधिकारी आल्याची चर्चा होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये ते एवढे रममाण होतात की त्यांच्यामधील भीती नाहीशी होऊन आत्मविश्वासाने विद्यार्थी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतात. गटशिक्षणाधिकारी शालेय भेटींदरम्यान केवळ पाहणी न करता थेट वर्गात जाऊन, हातात खडू घेऊन आणि शिक्षकाची भूमिका साकारत विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान किंवा इंग्रजीसारखे विषय शिकवून त्यांच्यात अभ्यासाची आवड निर्माण करून विद्यार्थ्यांना भविष्यात मोठे अधिकारी बनण्याची प्रेरणा दिली.

गटशिक्षणाधिकारींनी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधून आणि त्यांना प्रश्न विचारून, विद्यार्थ्यांना खरोखर किती समजले शिक्षणाचा दर्जा कसा आहे, याची प्रत्यक्ष तपासणी केली. स्वतः वर्गात खडू हातात घेऊन शिकवून विषय शिक्षकांनाही आपल्या अध्यापन पद्धतीत सुधारणा करण्याची आणि जबाबदारीने काम करण्यासाठी प्रेरित केले त्यांच्या सोबत आलेले गटसाधन केंद्र साकोली येथील ठाकूर यांनी ऑनलाईन कामाबद्दल मार्गदर्शन केले.

# सेवा संकल्प अभियानातून युवकांना रोजगार, कौशल्य विकास व उद्योजकतेचे मार्गदर्शन

### विविध शासकीय योजना व उपक्रमांची जनजागृती; ७१७ विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा:–** 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, भंडारा यांच्यामार्फत युवक-युवतींमध्ये रोजगार, कौशल्य विकास व उद्योजकतेबाबत जनजागृती करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत समर्थ विद्यालय, लाखनी तसेच लेट. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी येथे मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आले. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने अमित मलोडे, लिपिक-टंकलेखक यांनी विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना व उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी सेवायोजन कार्ड वेबपोर्टलवर नाव नोंदणी, रोजगारासाठी सहकार्य, रोजगार मेळावे, अल्प मुदतीचे कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, सेवा-सोसायटी नोंदणी, करिअर ग्रंथालय सदृश अभ्यासिका, उद्योजकतेशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच इनक्युबेशन सेंटर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. युवकांनी उपलब्ध शासकीय सेवा व योजनांचा लाभ घेऊन रोजगार, कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधींचा उपयोग करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

समर्थ विद्यालय, लाखनी येथे ३३७ विद्यार्थी-विद्यार्थिनी, तर लेट. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी येथे ३८० विद्यार्थी-विद्यार्थिनी, असे दोन्ही कार्यक्रमांना एकूण ७१७ विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांचे आयोजन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, भंडारा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या उपक्रमातून युवकांमध्ये कौशल्य विकास, रोजगार, प्रशिक्षण आणि उद्योजकतेच्या विविध संधींबाबत जागरूकता निर्माण करण्यास मदत झाली.

# महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी स्मृती वर्षानिमित्त विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा:–** महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी स्मृती वर्षानिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कार्यालय सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा यांच्या वतीने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर यांच्या सहभागाने समाज कल्याण विभागाच्या शासकीय व अनुदानित वसतिगृहांतील तसेच निवासी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, भंडारा येथे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे हा या आयोजनामागील प्रमुख उद्देश होता.

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे शालेय स्तरासाठी गट-अ, कनिष्ठ महाविद्यालय स्तरासाठी गट-ब आणि महाविद्यालयीन स्तरासाठी गट-क असे तीन गट करण्यात आले. प्रत्येक गटातील गुणानुक्रमे विजेत्या विद्यार्थ्यांना धनादेशाद्वारे प्रथम क्रमांकासाठी ३ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी १ हजार रुपये अशी पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी आशा कवाडे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रशांत दखने, विशेष अधिकारी विठ्ठलसिंग बलावणे तसेच गृहपाल योगराज सावरबांधे, शिवराम बारई आणि सुनिल बैतुल उपस्थित होते.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. जयश्री सातोकर, प्रा. डॉ. देवेंद्र सोनटक्के, प्रा. धनराज कलचार आणि सेवानिवृत्त प्रा. ग्यानचंद्र जांभूळकर यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंशिका सायरे यांनी केले. तर आभार योगराज सावरबांधे यांनी मानले.

## माता दंतेश्वरी मंदिरात नवरात्र उत्सवाची पूर्वतयारी

**जेवनाळा:–** पालांदूर येथील पोलीस ठाणे मार्गावरील माता दंतेश्वरी पटांगणावर तरुणाई गत हप्ताभरापासून स्वच्छतेकरिता एकवटली आहे. एक एकरातील भव्य पटांगणात सुशोभित मंडपाकरिता व रोषणाईकरिता तयारी जोमात आहे. कलशभवन सुशोभित करून भक्तगणांनी आपापला कलश नियोजित केला आहे. माता दंतेश्वरी मंदिर कमिटीचे सर्व सदस्य मातेच्या सेवेत समर्पित झाले आहेत.

नवरात्र उत्सव पालांदूर येथे अत्यंत उत्साही व अनोख्या पद्धतीने पार पाडले जाते. गत महिनाभरापासून येथील बच्चे कंपनी व तरुणाई गुजरातच्या धरतीवर दांडिया नृत्याचे प्रशिक्षण घेत आहेत.

## आर. एम. पटेल महिला कला महाविद्यालयात सेवा निवृत्त कार्यक्रम



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा:–** श्रीमती रेवाबेन मनोहर भाई पटेल महिला कला महाविद्यालय येथील शिक्षकेत्तर कर्मचारी बन्सीलाल शेंडे यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम ३०सप्टेंबर ०२६ ला पार पाडण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. रंजना शृंगारपुरे होते. व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ. शर्मा तसेच सेवानिवृत्त कर्मचारी बन्सी शेंडे सहपत्नी तारा शेंडे व मुलगा कार्यक्रमाला उपस्थित होते. त्याचा सपत्नीक शाल आणि पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. बन्सी शेंडे आपल्या भाषणात म्हणाले की हा माझा परिवार आहे आणि यांना सोडून जाताना मला आज दुःख होत आहे. ज्याप्रमाणे मी महाविद्यालयात कार्य केले तसेच आपण सुद्धा असेच कराल अशी मी आशा बाळगतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्वेता वेगड यांनी तर प्रास्ताविक डॉ. राहुल भोरे यांनी केले. त्यांनी बन्सी शेंडे यांच्या जीवनावर प्रकाश घातला. कर्तव्यावर असताना त्यांच्या सेवाभावी वृत्ती आणि केलेले कार्य यांच्या वर विस्तारित माहिती दिली. डॉ. शर्मा म्हणाले की शेंडे यांनी निस्वार्थी भाव सदैव आपल्या जीवनात अंगीकारले. प्रामाणिक आणि कष्टाने आपले सेवा कार्य पूर्ण केले. डॉ. ईश्वरकर, डॉ. नरंजे आणि बबिता भोंडेकर यांनी त्यांच्या सोबत आलेले अनुभव सांगितले कार्यक्रमाच्या वेळी सर्व कर्मचारी भावूक झाले. अध्यक्ष स्थानी असलेले प्राचार्य डॉ. रंजना शृंगारपुरे म्हणाले की शेंडे सारखा कर्मचारी लाभणे हे आमचे भाग्य आहे. अत्यंत प्रामाणिक मेहनती व्यक्ती आहेत त्यांनी महाविद्यालयाची खूप सेवा केली त्यासोबत ते इतरांना प्रेरणादायी आहेत. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि इतर कर्मचारी उपास्थित होते आभार डॉ. कल्पना नेवारे यांनी मानले.

## ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमाला सदिच्छा भेट

### ज्येष्ठांशी संवाद साधून अनुभव जाणून घेण्याचा विद्यार्थ्यांचा उपक्रम

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा:–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, भंडारा येथील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून बेला येथील वृद्धाश्रमाला सदिच्छा भेट दिली. सामाजिक उत्तरदायित्वाची भावना आणि ज्येष्ठांविषयी आदराची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या पुरस्कृत 'सिनीअर सिटीझन होम फॉर ५० एल्डरली वूमेन' या बेला येथील वृद्धाश्रमात विद्यार्थ्यांनी ज्येष्ठ महिलांशी संवाद साधला. यावेळी वसतिगृहाचे गृहपाल वाय. एस. सावरबांधे, वृद्धाश्रमाचे संचालक डॉ. वानखेडे, डॉ. वानखेडे यांच्यासह ४० ज्येष्ठ महिला, वसतिगृहातील ५२ विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्येष्ठांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. मोबाईल व डिजिटल माध्यमांच्या विश्वात मर्यादित न राहता घरातील तसेच परिसरातील ज्येष्ठ व्यक्तींशी संवाद साधावा, त्यांच्या अनुभवांचे ऐकून घेण्याची सवय लावून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. ज्येष्ठांच्या जीवनातील अनुभवांमधून प्रेरणा घेऊन संकटांचा सामना करण्याची क्षमता विकसित करणे, पालकांचा आदर करणे आणि त्यांना एकटेपणाची जाणीव होऊ न देणे, हे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

वृद्धाश्रमातील दैनंदिन नियोजन, आहार व्यवस्था, आरोग्य सेवा तसेच ज्येष्ठांच्या विविध गरजांबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. गृहपाल सावरबांधे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. ज्येष्ठांना डिजिटल तंत्रज्ञान व स्मार्टफोन वापरण्यास मदत करणे, त्यांना वर्तमानपत्रे वाचून दाखविणे तसेच मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून त्यांचे जीवन आनंददायी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी वसतिगृहाच्या वतीने वृद्धाश्रमातील सर्व ज्येष्ठ महिलांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

## तालुकास्तरीय स्पर्धेत यश



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**गोंडउमरी :–** लाल बहादूर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गोंडउमरी येथील विद्यार्थी यांनी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन केले.

यात खेमन डोंगरवार ३००० मिटर धावणे द्वितीय क्रमांक व क्रॉस कंट्री मध्ये प्रथम क्रमांक आर्यन उके, भालाफेक प्रथम क्रमांक, समीर ठाकरे हातोडा फेक मध्ये प्रथम क्रमांक, कुमारी गंधानिका भेंडारकर ३००० मीटर मध्ये प्रथम क्रमांक पटकाविले. सर्व विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दररोजचा दै. लोकजन वाचा
www. lokjan.com वर

# नवजीवन विद्यालयात वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा

### विविध स्पर्धांच्या विजेत्यांना बक्षीस वितरण



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**साकोली :–** नवजीवन विद्यालय व ज्युनिअर सायन्स कॉलेज, जमनापूर साकोली येथे वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून विशेष कार्यक्रम व विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम 'इरव्हीका फाउंडेशन', 'नवेगाव-नागझिरा टायगर रिझर्व्ह, गोंदिया' आणि 'रेंज फॉरेस्ट ऑफिस, साकोली' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. लोकानंद नवखरे होते. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त वैज्ञानिक डॉ. प्रेमानंद मेश्राम, प्रा. डॉ. जितेंद्र ठाकूर, इरव्हीका फाउंडेशनचे संचालक डॉ. एल. पी. नागपूरकर तसेच वनपाल सी. एच. बालपांडे मंचावर उपस्थित होते.

डॉ. प्रेमानंद मेश्राम यांनी आपल्या मार्गदर्शनातून सांगितले की वन्यजीव संवर्धन, पर्यावरण समतोल आणि मानवी जीवनातील जंगलांचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनातून डॉ. लोकानंद नवखरे यांनी वन्यजीवांचे रक्षण करणे ही काळाची गरज असून प्रत्येकाने निसर्गाप्रती आपली जबाबदारी ओळखली पाहिजे, असे विचार आपल्या भाषणातून मांडले.

वन्यजीव सप्ताहानिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध, प्रश्नमंजुषा, फेस पेंटिंग व वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन अर्चना नवखरे यांनी केले तर आभार मुकेश येसनसुरे यांनी मानले कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वनविभागाचे अधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कांशीरामजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन



**दै. लोकजन वृत्तसेवा**

**साकोली :–** सुमेध बुद्ध विहार, एकोडी येथे डी. एस. ४, बामसेफ आणि बहुजन समाज पार्टीचे संस्थापक, कांशीरामजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकनाथजी कोटांगले होते. तसेच तिर्थानंद बोरकर, कार्तिक मेश्राम आणि ग्रामपंचायत सदस्य भावेश कोटांगले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी साहेब कांशीरामजी यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या सामाजिक कार्याचे स्मरण केले. बहुजन समाजाच्या हक्कांसाठी, सामाजिक समता आणि न्यायासाठी साहेब कांशीरामजी यांनी दिलेल्या योगदानाला यावेळी उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमाला एकनाथ कोटांगले, रवी कोटांगले, कार्तिक मेश्राम, सुखराम जांभूळकर, तिर्थानंद बोरकर, भावेश कोटांगले, राधेश्याम नेवारे, कैलाश जांभूळकर, अमित भैसारे आणि रुपेश कोटांगले, जानबा बावनकर, नारद भेंडारकर उपस्थित होते. साहेब कांशीरामजी यांच्या विचारांना अभिवादन करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## एक नजर राज्यावर....

✪ मुंबई: वैमानिकांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. या पार्श्वभूमीवर, वैमानिकांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे का, तसेच ठराविक कालावधीनंतर त्यांची सायकोमेट्रिक चाचणी घ्यावी का, याबाबत विचार सुरू आहे.

✪ कॉकपिटमधील एखादा वैमानिक असमर्थ ठरल्यास त्याला बाहेर कसे काढायचे, याचे प्रशिक्षण दिले जाते. मात्र, वैमानिकावरच हल्ला झाल्यास स्थिती कशी हाताळायची, यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण नाही.

✪ भाजपा नेता आणि निवृत्त आयपीएस अधिकारी भास्कर राव यांनी केंद्रीय गृहमंत्रालयाला पत्र लिहून यूट्यूबर ध्रुव राठीचे नागरिकत्व आणि व्हिसा स्टेटसची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

✪ बंगळुरूमध्ये गुरूवारी (८ ऑक्टोबर) सीजेपीतर्फे निवडणूक आयोगाची एसआयआर प्रक्रिया आणि ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनात ध्रुव राठीही सामील झाला होता. यानंतर भास्कर राव यांनी हे पत्र लिहिले आहे.

# भंडारा जिल्ह्यातून चारा वाहतुकीवर बंदी; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

### चारा प्रथम स्थानिक पशुधनासाठी उपलब्ध करून देण्याचे निर्देश; उल्लंघन केल्यास कठोर कारवाई

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा:–** जिल्ह्यात यंदा अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. भंडारा जिल्ह्यात उत्पादित झालेला किंवा उपलब्ध असलेला चारा जिल्ह्याबाहेर वाहून नेण्यास बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार



यासंदर्भात आदेश जारी केले आहेत.

जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चारा व पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत स्थानिक पशुधनाचे संगोपन करणे आणि दुभत्या जनावरांना पुरेसा चारा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मात्र, जिल्ह्यातील चारा व्यावसायिक कारणांसाठी तसेच इतर जिल्ह्यांत पाठविला जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे स्थानिक पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

**कडबा, तणीस, सुकाचारा, घास वाहतुकीवर निर्बंध**

जिल्ह्यात उपलब्ध असलेला कडबा, तणीस, सुकाचारा, घास, उसाचे वाडे आदी प्रकारचा चारा अन्य जिल्ह्यांत कोणत्याही व्यावसायिक अथवा इतर कारणांसाठी वाहून नेण्यास बंदी लागू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील चारा उत्पादक, व्यापारी आणि संबंधित संस्थांनी आपल्याकडील चारा प्रथम स्थानिक शेतकरी, पशुपालक आणि गोशाळांना उपलब्ध करून द्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**उल्लंघन केल्यास कठोर कारवाई**

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती तसेच संबंधित वाहनांवर चारा जप्तीसह कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ५८ मधील लागू तरतुदींनुसार कारवाई केली जाणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. जिल्ह्यातील पशुधनाचे संरक्षण करणे आणि संभाव्य चारा टंचाईच्या काळात स्थानिक पशुपालकांना चारा उपलब्ध करून देणे हा या निर्णयाचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे संबंधित सर्वांनी आदेशाचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शितला माता मंदिरात घट नोंदणीला सुरुवात

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा:–** येथील आदिशक्ती शितला माता मंदिर खामतलाव येथे अश्विनी नवरात्र उत्सवानिमित्त घट नोंदणीला प्रारंभ करण्यात आले आहे. त्यात घटस्थापना रविवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ ला सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत, अष्टमीपुजा व हवन, सोमवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ ला दुपारी ४ वाजता, घट विसर्जन मंगळवार दिनांक २० ऑक्टोबर २०२६ ला सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत, महाप्रसाद वितरण शनिवार दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ ला सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. तसेच यादरम्यान दररोज सकाळी व संध्याकाळी ७ वाजता आरती होईल.

## धावण्याच्या स्पर्धेत वंशु कोसरे प्रथम; लांब उडीत सोनल बांतेची बाजी

### सरस्वती विद्यालयाच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**मोहाडी:–** श्री साईबाबा देवस्थान समिती, भंडारा द्वारा संचालित गुरुदेव चिंतामण बिसने कन्या विद्यालय व सरस्वती महिला कनिष्ठ महाविद्यालय, मोहाडी येथील विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करीत शाळेचा नावलौकिक वाढविला. या स्पर्धेत वंशु विनोद कोसरे हिने धावण्याच्या स्पर्धेत प्रथम, तर सोनल पुरुषोत्तम बांते हिने लांब उडीत प्रथम क्रमांक पटकावला. या सर्व खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या ६०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत वंशु विनोद कोसरे हिने प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत प्रथम क्रमांक मिळविला. याच वयोगटातील ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सृष्टी राम भडके हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तर १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत अस्मिता



किशोर ढेंगे हिने तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या लांब उडी स्पर्धेत सोनल पुरुषोत्तम बांते हिने प्रथम क्रमांक मिळवित आपल्या क्रीडाकौशल्याची छाप पाडली. या यशामुळे विद्यालयातील क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे. आता जिल्हास्तरीय स्पर्धेतही या खेळाडूंकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष अभिजीत आनंदराव वंजारी, प्राचार्या सुषमा अभिजीत वंजारी, मार्गदर्शक मेघराज नरेटी व नरेंद्र गायधने, प्रशिक्षक पवन पडोळे व जीवन मते यांच्यासह सुषमा राघोर्ते, प्रा. ओमकार डोंगरवार, प्रा. पल्लवी चांदेवार, प्रा. प्रिया निमकर, प्रा. कल्याणी पारधी, प्रा. प्रतिभा वाघमारे, वर्षा भोवते, नागनाथ शाहू, रणजीत शेंडे, सानु डाकरे, कल्याणी दुबे, वनिता बोरकर, भुमेश्वर धकाते, उत्कर्ष दुबे, प्रगती ठाकरे, आशुतोष सोनकुसरे, नरेश देशभ्रतार आणि तारा बावनकुळे यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## भंडारा जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बैठक संपन्न

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा:–** दिनांक ०९ आक्टोंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यालय, तिलक वार्ड, भंडारा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते खा. प्रफुल पटेल व खा. राजेंद्र जैन यांच्या सूचनेनुसार युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे जिल्हाध्यक्ष नाना पंचबुद्धे, प्रदेश महासचिव धनंजय दलाल, युवक अध्यक्ष यशवंत सोनकुसरे, विधानसभा अध्यक्ष देवचंद ठाकरे, उपसभापती नागेश भगत, दुधसंघाचे संचालक हितेश सेलोकर, सोनु खोब्रागडे, यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली.



यावेळी धनंजय दलाल यांनी युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नवीन कार्यकारिणी गठित करण्यासंबंधी सूचना दिली तसेच नवीन युवकांच्या समावेश कार्यकारणीत करावा व संघटन वाढवावे असे आवाहन केले.

जिल्हाध्यक्ष नाना पंचबुद्धे यांनी प्रत्येक तालुक्यामध्ये दौरे करून बैठक घेण्यात यावी. बुथ कमिटी तयार करण्यात यावी असे संगितले. यावेळी युवक अध्यक्ष यशवंत सोनकुसरे यांनी सर्व तालुका अध्यक्षांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. आपल्या कार्यकारीणीत नवीन युवकांना स्थान द्यावे व संघटना वाढविण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन तालुका व शहर युवक अध्यक्षांना केले.

प्रत्येक तालुक्यातील युवक अध्यक्षांनी आपल्या क्षेत्रातील कार्याचा आढावा दिला आणि प्रत्येक तालुक्यामध्ये बैठका घेऊन नवीन कार्यकारणी गठीत करून यादी अद्यावत करण्यात येईल व बुथ याद्या तयार करण्यात येईल. असा संकल्प करण्यात आला. याप्रसंगी उपस्थितांमध्ये सर्वश्री आशिष दलाल, रोहीत बुरडे, हेमंत मिनवाडे, मनोज झुरमुरे, राकेश राऊत, अनील टेंभरे, प्रविण भांडारकर, जितेंद्र बोंदरे, अरमान धरमशहारे, रजनीश बन्सोड, संजय लांजेवार, प्रभाकर बोदेले, उत्तम कळपाते, सुनिल थोटे, करण लुटे, विकेश मेश्राम, राहुल तितीरमारे, राजकुमार खोब्रागडे, साहील हुमने, जगदीश सुखदेवे, अमोल मोहरकर, प्रतीक मेश्राम, जगदीश उके, संजय वरगंटीवार, चुन्नीलाल माटे, अंकुश चुटे, तुकडुदास कुंभलकर, आकाश कडुकर, रवि लक्षणे, ललीत खोब्रागडे, सोनु रंगारी, नरेश येवले, मंगेश रेहपाडे, श्रीधर हिंगे, नरेंद्र चौधरी, अनिल भोयर, दामोधर पंधरे, दुर्योधन अठराहे, सुमित पाटील, राजु सतदेवे व युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घटांच्या ज्योतीने भक्तिमय प्रकाशाने उजळणार रावणवाडी येथील अंबामाता देवस्थान

**भंडारा:–** निसर्गरम्य जलाशयाच्या सान्निध्यात वसलेल्या रावणवाडी येथील जागृत अंबामाता देवस्थानात यंदाही नवरात्र महोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. रावणवाडी व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक पद्धतीने घटस्थापना करण्यात येणार असून, घटांच्या पवित्र ज्योतींनी अंबामाता देवस्थान परिसर भक्तिमय वातावरणाने उजळून निघणार आहे.

रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता घटस्थापना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ज्योतप्रज्वलनासाठी विशेष मान्यवर उपस्थित राहणार असून, घटस्थापनेनंतर भाविकांसाठी महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे. सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता कलश यात्रा, घटविसर्जन आणि त्यानंतर महाप्रसाद वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर रावणवाडी जलाशय परिसर आणि अंबामाता देवस्थान परिसर सजविण्यात आला असून, नवरात्र महोत्सवासाठी ग्रामस्थ व देवस्थान समितीच्या वतीने विशेष तयारी करण्यात येत आहे.

या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी अंबामाता देवस्थान समितीचे अध्यक्ष यादोराव कुथे, उपाध्यक्ष ईश्वर मस्के, सचिव जगदीश उईके, कोषाध्यक्ष सचिन मस्के, सहसचिव शेषराव पंधरे आणि संयोजक अविनाश उईके परिश्रम घेत आहेत. तसेच संचालक मंडळातील मोतीसिंग वरखडे, शेषराव मते, रवींद्रसिंह उईके, राम वखरकार, ज्ञानेश्वर मरसकोले, हिरालाल भलावी, नथु फेंडर, कविता कीर्ती उईके, शांताबाई उईके आणि श्यामकला कानतोडे यांच्यासह ग्रामस्थ व भाविकांचे सहकार्य लाभत आहे.

### अवैध रेती वाहतूक, ट्रॅक्टर जप्त

**पालांदूर :–** मपोशि. सुभांगी प्रभू बेलखोडे, पो.स्टे. पालांदूर ह्या भुगाव मेंढा येथे चुलबंद नदीचे डोंगरगाव नदीपात्रात गेल्या असता आरोपी विलास देवरामजी ईटवले, वय ३७, रा. सोमनाळा, ता. लाखनी हा आपल्या ट्रॅक्टर क्रमांक एम.एच. ३६ झेड ८५२४ मध्ये रेती भरताना दिसला. पोलिसांना पाहताच त्याने नदीच्या पाण्यात रेती सांडून ट्रॅक्टरसह पळ काढला, मात्र नंतर ट्रॅक्टर पकडण्यात आले. ट्रॅक्टर, ट्राली व रेती असा एकूण ७ लाख ८० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

## महिलांचे स्वयंरोजगाराच्या दिशेने एक पाऊल

### भंडाऱ्यात नवरात्री व दिवाळीनिमित्त प्रदर्शन

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा :–** महिलांच्या उद्यमशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी व आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी महिलांच्या वतीने नवरात्री व दिवाळीनिमित्त दोन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन १२ व १३ ऑक्टोबर रोजी साई प्लाझाजवळील राजस्थानी भवन, भंडारा येथे सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत खुले राहणार आहे.

'स्वयंरोजगाराच्या दिशेने महिलांचे एक पाऊल' या भावनेतून आयोजित या उपक्रमाद्वारे महिलांना आपल्या व्यवसायाची ओळख करून देण्याची आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे. महिलांच्या कौशल्याला व मेहनतीला व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

नवरात्री व दिवाळीच्या खरेदीसोबतच महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी भंडारा शहर व परिसरातील नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांसह प्रदर्शनाला भेट द्यावी आणि महिलांच्या स्वयंरोजगाराच्या प्रयत्नांना पाठबळ द्यावे, असे आवाहन आयोजक महिलांनी केले आहे.

# भंडारा जिल्ह्यात खरीप पीक नुकसानाचे सर्वेक्षण सुरु

### पालोरा परिसरात संयुक्त पथकाकडून प्रत्यक्ष शेतात पाहणी

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**करडी/पालोरा:–** २०२६ च्या खरीप हंगामात भंडारा जिल्ह्यात झालेल्या दुष्काळ आणि पीक नुकसानीच्या पार्श्वभूमीवर शासनाने सर्वेक्षणाचे आदेश दिले आहेत. यासाठी जिल्ह्यातील मोहाडी आणि तुमसर या दोन तालुक्यांची विशेष सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली आहे.

या दोन्ही तालुक्यांमध्ये प्रमुख ५ पिकांचे २०% नमुना सर्वेक्षण व प्रत्यक्ष क्षेत्र पडताळणी करण्याचे निर्देश कृषी विभागाला देण्यात आले आहेत. या सर्वेक्षणात पथक प्रत्यक्ष शेतावर जाऊन पीक स्थितीची पडताळणी करणार आहे. यामध्ये पिकाचे क्षेत्रफळ, प्रत्यक्ष पिकाची स्थिती, पीक नुकसानाची टक्केवारी निश्चित



पंचनामा करतांना तलाठी प्रिया ठवकर, ग्रामपंचायत अधिकारी अक्षय शेळके, कृषी सहायक क्षितीज देवले

करणे, जी.पी.एस./जीओ टॅगड छायाचित्रे घेणे, आवश्यक असल्यास शेतकऱ्याची माहिती व विमा दाव्याची तपासणी करून सर्वेक्षणाचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर केला जाणार आहे.

पालोरा परिसरात आज तलाठी प्रिया ठवकर, ग्रामपंचायत अधिकारी अक्षय शेळके आणि कृषी सहाय्यक क्षितीज देवळे यांच्या संयुक्त पथकाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पंचनामा केला असून सदर अहवाल मध्ये नोंद करण्यात आली आहे. यावेळी शेतकरी परसराम लांडगे, मंगेश डोमळे, कैलास बांते, व इतर शेतकरी उपस्थित होते. या सर्वेक्षणामुळे पीक विमा आणि नुकसान भरपाईसाठी अचूक माहिती शासनाला मिळणार असून, शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाच्या अंमलबजावणीसाठी भंडाऱ्यात मोर्चा

### मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतरही अंमलबजावणी रखडली; वृत्तपत्र विक्रेत्यांची शासनाकडे मागणी

**दै. लोकजन वृत्तसेवा**

**भंडारा :–** महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची तातडीने अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. गेल्या १६ ते १७ वर्षांपासून आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांनी या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.



महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. १० ऑक्टोबर २०२४ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळासंदर्भात निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या संघर्षाला यश मिळेल आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, मंत्रिमंडळाची मंजुरी मिळूनही महामंडळाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नसल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ऊन, पाऊस, थंडी आणि वाऱ्याची पर्वा न करता पहाटेपासून घरोघरी वृत्तपत्र पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम वृत्तपत्र विक्रेते करतात. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत बातम्या आणि माहिती पोहोचविणाऱ्या या कष्टकरी असंघटित घटकाला सामाजिक व आर्थिक सुरक्षा मिळावी, तसेच त्यांच्या भविष्याचा विचार करून कल्याणकारी महामंडळाची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने निवेदनातून केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून महामंडळाच्या मागणीसाठी पाठपुरावा सुरू असून, शासनाने घेतलेल्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी आणि वृत्तपत्र विक्रेत्यांना न्याय मिळावा, यासाठी राज्यभर लोकशाही व शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्यात येत असल्याचे संघटनेने नमूद केले.

निवेदन देतेवेळी किशोर मोरे, राजू डोरले, आहुजा डोंगरे, ईश्वर धकाते, नरेंद्र गौरी, रुपेश नंदनवार, अंगपाल पारधी, अरविंद शेंडे, अजय मेश्राम यांच्यासह संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची लवकरात लवकर अंमलबजावणी करून राज्यातील हजारो कष्टकरी वृत्तपत्र विक्रेत्यांना सामाजिक व आर्थिक सुरक्षा प्रदान करावी, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### विहिरीत पडून ७८ वर्षीय वृद्धाचा मृत्यू

**सिहोरा :–** येथे विहिरीत पडून एका ७८ वर्षीय वृद्धाचा बुडून मृत्यू झाला आहे. मृतकाचे नाव गोविंद नंदलाल भोंडेकर, वय ७८ वर्ष, रा. सिहोरा वार्ड क्र. ५ असे आहे. ते मागील १० वर्षांपासून पोटाच्या विकाराने त्रस्त होते. लोकांच्या मदतीने वडिलांना पाण्याबाहेर काढून ग्रामीण रुग्णालय सिहोरा येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यांना विहिरीच्या पाण्यात बुडून मृत घोषित केले.

**कार्यालय नगर परिषद साकोली–सेंदुरवाफा,जि.भंडारा**

**जाहीर सुचना**

याद्वारे सर्व जनतेला सुचित करण्यात येते कि, अर्जदार श्री बाळकृष्ण दसाराम गेडाम राह. साकोली, ता. साकोली, जि. भंडारा येथील रहिवासी असुन चंद्रप्रभा उर्फ अनुसयाबाई दसाराम गेडाम, राह. साकोली यांचे नावाने भोगवटदार म्हणून पंचशिल वॉर्ड, साकोली मधील मालमत्ता क्र. २६०२ वरील आर. सी. सी. चे घर क्षेत्रफळ –३० X ३० = ९०० चौ. फुट मध्ये मृत्यू प्रमाणपत्र, बहिणीचे संमत्तीपत्र (नोटरी) नुसार अर्जदार यांचे नाव फेरफार करण्याकरिता या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

सबब ज्या कुणाला आक्षेप किंवा उजर तक्रार असल्यास ही जाहीर सुचना प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसाचे आत आपला लेखी आक्षेप किंवा उजर तक्रार या कार्यालयास सादर करावा. वेळेच्या आत कुणाचाही आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित व्यक्तीच्या नावे फेरफार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**स्वा/–**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद साकोली सेंदुरवाफा**

**मराठी दैनिक लोकजन** मालक, मुद्रक,प्रकाशक दिलीप पारधी यांनी हे वृत्तपत्र लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वार्ड, भंडारा येथून मुद्रित करून लोकजन कार्यालय, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वार्ड, भंडारा येथून प्रकाशित केले. ✽मुख्य संपादक– एच. एच. पारधी, भ्रमणध्वनी ९९७५०४७६३५, ९४२३११३०३३, ✽स्थानिक संपादक–काशिनाथ ढोमणे ९४२१७१००५२ ✽ ई–मेल–lokjanprakashan@gmail.com (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.) प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख व स्तंभलेखन यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमतच असतील असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)